भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५

(१९५५ चा अधिनियम क्रमांक १०)

[१७ फेब्रुवारी १९९५ रोजी यथाविद्यमान]

[महाराष्ट्र विशोधनांसहित]

# The Essential Commodities Act, 1955

(Act No. 10 of 1955)

[As in force on the 17th February 1995]

[In its application to the State of Maharashtra]

संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९८

[ किंमत रु. ४-०० ]

## प्राक्कथन

या आवृतीत, दिनांक १७ फेब्रुवारी १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला दि इसेंसियल कमॉडिटीज ॲक्ट, १९५५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक १, दिनांक २२ जून १९९५ यात पृष्ठ ३७ ते ५४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

के. एल. मोहनपुरीया,
सचिव, भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक २२ जून १९९५.

## PREFACE

This edition of the Essential Commodities Act, 1955 as on the 17 February 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 6, dated 22nd June 1995 on pages 37 to 54.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2. clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI,
Date : 22nd June 1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

## अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५

### अनुकूलन आदेश व विशोधन अधिनियम यांची सूची

१. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६.
२. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा १३).
३. अत्यावश्यक वस्तु (दुसरे विशोधन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा २८).
४. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९६१ (१९६१ चा १७).
५. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९६४ (१९६४ चा ४७).
६. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९६६ (१९६६ चा २५).
७. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९६७ (१९६७ चा १४).
८. अत्यावश्यक वस्तु (दुसरे विशोधन) अधिनियम, १९६७ (१९६७ चा ३६).
९. केंद्रीय विधि (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९६८ (१९६८ चा २५).
१०. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९७१ (१९७१ चा ६६).
११. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९७४ (१९७४ चा ३०).
१२. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ९२).
१३. अत्यावश्यक वस्तु (महाराष्ट्र विशोधन) अधिनियम, १९७५ (१९७६ चा १).
१४. अत्यावश्यक वस्तु (विशेष उपबंध) अधिनियम, १९८१ (१९८१ चा १८).
१५. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९८४ (१९८४ चा ३४).
१६. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९८६ (१९८६ चा ४२).
१७. अत्यावश्यक वस्तु (विशोधन) अधिनियम, १९८६ (१९८६ चा ७३).

मुद्र ४१७९–१अ

# अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा, वितरण, इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार.

४. राज्य शासन, इत्यादींना कर्तव्ये नेमून देणे, इ.

५. अधिकारांचे प्रत्यायोजन.

६. इतर अधिनियमितींशी विसंगत अशा आदेशांचा परिणाम.

६क. अत्यावश्यक वस्तूचे अधिहरण करणे.

६ख. अत्यावश्यक वस्तूचे अधिहरण करण्यापूर्वी "कारणे दाखवा" नोटीस काढणे.

६ग. अपील.

६घ. अधिहरणाचा निवाडा इतर शिक्षांच्या आड यावयाचा नाही.

६ङ. विवक्षित प्रकरणी अधिकारितेला आडकाठी.

७. शिक्षा.

७क. विवक्षित रकमा जमीन-महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा केंद्र शासनाचा अधिकार.

८. प्रयत्न आणि अपप्रेरण.

९. खोटे कथन.

१०. कंपन्यांनी केलेले अपराध.

१०क. अपराध दखलपात्र आणि बिनजामिनी असणे.

१०ख. या अधिनियमान्वये सिद्धदोषी ठरलेल्या कंपन्यांचे नाव, धंद्याचे ठिकाण, इत्यादी प्रसिद्ध करण्याचा न्यायालयाचा अधिकार.

१०ग. आरोपींची मानसिक अवस्था दोषार्ह असल्याचे गृहीत धरणे.

११. अपराधांची दखल घेणे.

१२क. खास न्यायालयांची स्थापना.

१२कक. खास न्यायालयाद्वारे न्यायचौकशीयोग्य अपराध.

१२कख. अपील व पुनरीक्षण.

१२कग. खास न्यायालयासमोरील कार्यवाहींना संहिता लागू असणे.

१२ख. दिवाणी न्यायालयांनी व्यादेश देणे, इत्यादी.

१३. आदेशांबाबत गृहीतक.

१४. विवक्षित प्रकरणांत शाबितीचा भार.

१५. अधिनियमाखाली केलेल्या कारवाईला संरक्षण.

१५क. लोकसेवकांविरुद्ध खटला भरणे.

१६. निरसन व व्यावृत्ती.

महाराष्ट्र विशोधन अधिनियम.

शब्दसूची :—मराठी - इंग्रजी.

इंग्रजी - मराठी.

# अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५

## (सन १९५५ चा अधिनियम क्रमांक १०)[1]

(दिनांक १७ फेब्रुवारी, १९९५ रोजी यथाविद्यमान)

[१ एप्रिल, १९५५]

जनसाधारणाच्या हितार्थ विवक्षित वस्तूंचे उत्पादन, पुरवठा व वितरण आणि तद्विषयक व्यापार व वाणिज्य यांचे नियंत्रण करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमास 'अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५' असे म्हणता येईल.

(२) [2]*** संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,—

*[3][ (एक-क) "संहिता" याचा अर्थ, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' असा आहे ; आणि ]

१९७४ चा २.

[4][ [5][ (दोन-क) ] "जिल्हाधिकारी" यामध्ये, अपर जिल्हाधिकाऱ्याचा आणि या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्याकरिता व त्याचे अधिकार वापरण्याकरिता जिल्हाधिकारी प्राधिकृत करील अशा, उप-विभागीय अधिकाऱ्यांपेक्षा खालचा दर्जा नसलेल्या अन्य अधिकाऱ्याचा समावेश आहे ; ]

(क) "अत्यावश्यक वस्तु" याचा अर्थ, पुढीलपैकी कोणताही वस्तुवर्ग असा आहे :—

(एक) पेंड आणि इतर सत्वे यांसुद्धा गुरांची वैरण ;
(दोन) कोक आणि इतर तज्जन्य पदार्थ यांसुद्धा कोळसा ;
(तीन) मोटारींचे घटकभाग आणि उपसाधने ;
(चार) सुती आणि लोकर कापड ;
[6][ (चार-क) औषधिद्रव्ये ;

१९४० चा २३.

**स्पष्टीकरण.**—या उपखंडात "औषधिद्रव्य" या शब्दाचा अर्थ, 'औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम, १९४०' याच्या कलम ३, खंड (ख) मध्ये त्या शब्दास नमून दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल ; ]

(पाच) खाद्य तेलबिया आणि तेले यांसुद्धा अन्नसामग्री ;
(सहा) लोखंड आणि पोलाद यांची यंत्रनिर्मित उत्पादने यांसुद्धा लोखंड आणि पोलाद ;
(सात) वृत्तपत्री कागद, कागदी पुठ्ठा, पेंढ्यापासून बनवलेला पुठ्ठा यांसुद्धा कागद ;
(आठ) पेट्रोलियम आणि पेट्रोलियम उत्पादने ;
(नऊ) कच्चा कापूस—मग तो सरकी काढलेला असो या सरकी न काढलेला असो—आणि सरकी ;
(दहा) कच्चा ताग ;

---

१. १९६२ चा विनियम १२, कलम ३ व अनुसूची यांद्वारे, गोवा, दमण व दीव यांवर १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे दादरा व नगर-हवेली यांवर आणि १९६५ चा विनियम ८, कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमिनदिवी बेटांवर हा अधिनियम विस्तारित करण्यात आला.
२. "जम्मु व काश्मीर राज्य खेरीजकरून" हा मजकूर सन १९६८ चा अधिनियम २५ याचे कलम २ आणि अनुसूची यांद्वारे वगळण्यात आला (१५ ऑगस्ट, १९६८ रोजी व तेव्हापासून).
३. १९८१ चा अधिनियम १८, कलम ३ (क्) द्वारे घातले.
४. १९७६ चा अधिनियम ९२, कलम २ द्वारे घातले.
५. १९८१ चा अधिनियम १८, कलम ३ (क्) द्वारे नवीन क्रमांक दिला.
६. १९७४ चा अधिनियम ३०, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आला (२२ जून, १९७४ रोजी व तेव्हापासून).

* १९८१ चा अधिनियम १८ अन्वये मूळ अधिनियमात केलेली विशोधने ही ५ वर्षांपुरती अंमलात होती. परंतु १९८७ चा अधिनियम २५, कलम २ अन्वये ही मुदत १० वर्षे करण्यात आली आहे. (दि. २८–८–१९८७ रोजी व तेव्हापासून.) वरील अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून ५ वर्षांऐवजी १० वर्षांच्या मुदतसमाप्तीनंतर तो अंमलात असण्याचे बंद होईल (दिनांक २८-८-१९८७ रोजी व तेव्हापासून).

(अकरा) जी वस्तू, तिच्याबाबत संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील तिसऱ्या सूचीमधील ३३ व्या नोंदीच्या आधारे संसदेला कायदे करण्याचा अधिकार आहे अशा प्रकारची असून जी या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अत्यावश्यक वस्तू असल्याचे केंद्र शासन अधिसूचित आदेशाद्वारे घोषित करील अशी अन्य कोणत्याही वर्गातील वस्तू ;

(ख्) "अन्नपिके" यामध्ये उसाच्या पिकांचा समावेश आहे ;

(ग्) "अधिसूचित आदेश" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेला आदेश असा आहे ;

[1][ (ग्ग्) "आदेश" यामध्ये, त्याखाली दिलेल्या निदेशाचा समावेश आहे ; ]

[2][ (घ्) "राज्य शासन" याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्याचा प्रशासक असा आहे ; ]

[3][ (ङ्) "साखर" याचा अर्थ—

(एक) खडीसाखरसुद्धा ९० टक्क्यांहून जास्त सुक्रोजने युक्त असलेली कोणत्याही प्रकारची साखर असा आहे ;

(दोन) खांडसरी साखर किंवा बुरा साखर किंवा पिठी साखर अथवा कोणतीही दाणेदार किंवा भुकटीच्या स्वरूपातील साखर असा आहे ; किंवा

(तीन) निर्वात पात्र साखर कारखान्यातील प्रक्रियाधीन साखर किंवा तेथे उत्पादन करण्यात आलेली कच्ची साखर असा आहे. ]

[4][ (च्) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न दिलेले आणि संहितेमध्ये व्याख्या दिलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांना त्या संहितेमध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील. ]

**अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा, वितरण, इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार.**

**३.** (१) जर कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा चालू ठेवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी अथवा त्यांच्या न्यायोचित वितरणाची आणि रास्त किंमतीला त्या उपलब्ध होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी [5][अथवा भारताच्या संरक्षणाकरता किंवा लष्करी कामगिऱ्यांच्या कार्यक्षम संचालनाकरता एखाद्या अत्यावश्यक वस्तूची सुनिश्चिती करण्यासाठी] तसे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे असे जर केंद्र शासनाचे मत असेल तर, केंद्र शासनाला आदेशाद्वारे तिचे उत्पादन, पुरवठा व वितरण आणि तद्विषयक व्यापार व वाणिज्य यांचे विनियमन करण्याचा किंवा ते मना करण्याचा उपबंध करता येईल.

(२) पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांच्या व्यापकतेला बाध न येता, त्यांखाली देण्यात आलेल्या आदेशाद्वारे पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येईल :—

(क्) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन किंवा निर्मिती यांचे लायसनाद्वारे, परवान्याद्वारे किंवा अन्यथा विनियमन करणे ;

(ख्) कोणतीही पडीक किंवा कृषियोग्य जमीन—मग ती एखाद्या इमारतीस अनुलग्न असो वा नसो—लागवडीखाली आणणे, सरसकट सर्व अन्नपिके किंवा विनिर्दिष्ट अन्नपिके काढणे, आणि सरसकट अन्नपिकांची किंवा विनिर्दिष्ट अन्नपिकांची लागवड अन्यथा चालू ठेवणे किंवा वाढवणे ;

(ग्) अत्यावश्यक वस्तू किती किंमतीला खरेदी करता येईल किंवा विकता येईल तीवर नियंत्रण ठेवणे ;

(घ्) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूची साठवण, परिवहन, वितरण, विल्हेवाट, संपादन, वापर किंवा उपभोग यांचे लायसनाद्वारे किंवा परवान्याद्वारे किंवा अन्यथा विनियमन करणे ;

(ङ्) सामान्यतः विक्रीसाठी ठेवल्या जाणाऱ्या कोणत्याही अत्यावश्यक वस्तूची विक्री रोखून धरण्यास मनाई करणे ;

[5][ (च्) जिच्याकडे कोणत्याही अत्यावश्यक वस्तूचा साठा असेल अथवा जी अत्यावश्यक वस्तूच्या उत्पादनात किंवा तिच्या खरेदी-विक्रीच्या व्यवसायात गुंतलेली असेल अशा कोणाही

---

१. १९६७ चा अधिनियम ३६, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२. विधि अनुकूलन (क्र. ३) आदेश, १९५६ द्वारे मूळ खंड (घ्) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

३. १९८१ चा अधिनियम १८, कलम ३ द्वारे घातले.

४. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

५. १९५७ चा अधिनियम ३६, कलम २ द्वारे मूळ खंड (च्) ऐवजी जो मजकूर घातला होता त्या जागी आता १९७६ चा अधिनियम ९२, कलम ३ द्वारे हा मजकूर घातला.

व्यक्तीने केंद्र शासनाला अथवा एखाद्या राज्य शासनाला अथवा अशा शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याला किंवा अभिकर्त्याला अथवा अशा शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या महामंडळाला अथवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य व्यक्तीला किंवा व्यक्तीवर्गाला त्यात विनिर्दिष्ट अशा परिस्थितीत,——

(क्) आपण साठ्यात बाळगलेला किंवा उत्पादन केलेला किंवा आपल्या हाती आलेला माल संपूर्णतः किंवा त्याचा एखादा विनिर्दिष्ट भाग विकावा म्हणून, अथवा

(ख्) आपण जी वस्तू उत्पादन करण्याची किंवा जी आपल्या हाती येण्याची शक्यता आहे अशा कोणत्याही अत्यावश्यक वस्तुच्या बाबतीत, अशा वस्तुचे आपण उत्पादन केल्यावर किंवा ती आपल्या हाती आल्यावर विकावा म्हणून,

तिला भाग पाडणे.

**स्पष्टीकरण १.**——अन्नधान्ये, खाद्य तेलबिया व खाद्य तेले यांच्या संबंधात या खंडाखाली केलेल्या आदेशाद्वारे, संबंधित क्षेत्रात अशी अन्नधान्ये, खाद्य तेलबिया व खाद्य तेले यांचे अंदाजे उत्पादन किती होणार ते ध्यानात घेऊन, अशा क्षेत्रात उत्पादकांनी किती माल विकावा ते परिमाण निश्चित करता येईल, अथवा उत्पादकांनी किंवा त्यांच्या वहिवाटीखाली एकूण किती क्षेत्र धारण केलेले आहे ते ध्यानात घेऊन, श्रेणीवारीच्या तत्त्वावर असे परिमाण निश्चित करण्याचा उपबंध करता येईल.

**स्पष्टीकरण २.**——या खंडाच्या प्रयोजनार्थ, "उत्पादन" या शब्दाचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसुद्धा त्याच्या अर्थात, खाद्यतेलांच्या व साखरेच्या निर्मितीचा समावेश आहे; ]

(छ्) खाद्यपदार्थांची किंवा सुती कापडांशी संबंधित असे ज्या कोणत्याही वर्गातील वाणिज्यिक किंवा वित्तीय संव्यवहार हे आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाच्या मते लोकहिताला हानिकारक आहेत किंवा ज्यांचे विनियमन न केल्यास हानीकारक ठरण्यासारखे आहेत त्यांचे विनियमन करणे किंवा ते मना करणे;

(ज्) पूर्वोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबींचे विनियमन करण्याच्या किंवा त्या मना करण्याच्या दृष्टीने कोणतीही माहीती किंवा आकडेवारी गोळा करणे;

(झ्) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण किंवा तद्विषयक व्यापार व वाणिज्यव्यवहार यांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींना, आदेशामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशी त्यांच्या धंद्याशी संबंधित असलेली पुस्तके, हिशेब आणि अभिलेख ठेवण्यास आणि निरीक्षणार्थ हजर करण्यास आणि त्यासंबंधिची माहिती सादर करण्यास फर्मावणे;

[1][ (झ्झ्) लायसने व परवाने किंवा अन्य दस्तऐवज मंजूर करणे किंवा पुरःसृत करणे, त्याबद्दल शुल्क आकारणे, असे कोणतेही लायसन, परवाना किंवा इतर दस्तऐवज यांच्या शर्तींच्या रितसर पालनासाठी तारण म्हणून आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी कोणतीही रक्कम अनामत ठेवणे, याप्रमाणे अनामत ठेवण्यात आलेली रक्कम किंवा तिचा कोणताही भाग अशा कोणत्याही शर्तींचे व्यतिक्रमण झाल्यास जप्त करणे; आणि आदेशात विनिर्दिष्ट केले जाईल अशा प्राधिकरणाने अशा जप्तीचा अभिनिर्णय करणे ; ]

[2][ (ञ्) कोणत्याही आनुषंगिक व पूरक गोष्टी——विशेषतः पुढील गोष्टींचा त्यात समावेश आहे——परिवास्तू, वायुयाने, जलयाने, वाहने किंवा इतर याने यांच्या ठिकाणी प्रवेश करून त्यांची आणि जनावरांची झडती घेणे किंवा तपासणी करणे, आणि असा प्रवेश, झडती किंवा तपासणी करण्यास, प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीने पुढील वस्तूंचे अभिग्रहण करणे :——

(एक) ज्या कोणत्याही वस्तूंबाबत आदेशाचे व्यतिक्रमण झालेले आहे, होत आहे किंवा होण्याच्या बेतात आहे असे समजण्यात अशा व्यक्तीला कारण आहे त्या वस्तू आणी ज्यामध्ये अशा वस्तू सापडल्या ती आवेष्टने, आच्छादने किंवा पात्रे;

(दोन) अशा वस्तूंचे ने-आण करण्यासाठी वापरण्यात येणारे एखादे वायुयान, जलयान, वाहन किंवा अन्य यान किंवा जनावर या अधिनियमाच्या उपबंधाखाली जप्त होण्यास पात्र आहे असे समजण्यास अशा व्यक्तीला कारण असल्यास असे वायुयान, जलयान, वाहन किंवा अन्य यान किंवा जनावर;

[3][ (तीन) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत अशा व्यक्तीच्या मते उपयोगी पडण्यासारखी किंवा संबद्ध ठरण्यासारखी असतील अशी कोणतीही हिशेब-पुस्तके व दस्तऐवज——अशी हिशेब-पुस्तके जिच्या ताब्यातून ते घेतले त्या व्यक्तीला अशी हिशेब-पुस्तके व दस्तऐवज ज्याच्या ताब्यात आहेत अशा अधिकाऱ्याच्या समक्ष त्यांच्या नकल करून घेण्याचा व त्यातील उतारे काढून घेण्याचा हक्क राहील. ] ]

---

१. १९६१ चा अधिनियम १७, कलम २ द्वारे सामाविष्ट करण्यात आला.
२. १९७१ चा अधिनियम ६६, कलम २ द्वारे खंड (ञ्) ऐवजी दाखल करण्यात आला.
३. १९७६ चा अधिनियम ९२, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले.

(३) पोटकलम (२) च्या खंड (च) ला अनुलक्षून काढण्यात आलेल्या आदेशाला अनुसरून एखादी व्यक्ती कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंची विक्री करिल तेव्हा, त्या व्यक्तीला त्याबाबत यापुढे उपबंधित करण्यात आल्याप्रमाणे किंमत देण्यात येईल :—

(क) या कलमाखाली निश्चित करण्यात आलेली काही नियंत्रित किंमत असल्यास, जेव्हा त्या किंमतीशी सुसंगत अशी किंमत उभयसंमत होऊ शकत असेल तेव्हा ती संमत किंमत;

(ख) जेव्हा असे कोणतेही मतैक्य होऊ शकत नाही तेव्हा, नियंत्रित किंमत असल्यास, तिच्या संदर्भात परिगणना करून ठरवण्यात आलेली किंमत;

(ग) जेव्हा खंड (क) आणि खंड (ख) यांतील कोणताही खंड लागू होत नसेल तेव्हा, विक्रीच्या दिनांकास त्या स्थानिक भागात प्रचलित असलेल्या भावानुसार परिगणना करून ठरवण्यात आलेली किंमत.

[1][(३क) (एक) जर वाढत्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अथवा कोणत्याही स्थानिक भागात खाद्य पदार्थांची साठेबाजी रोखण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (२) च्या खंड (च) ला अनुलक्षून देण्यात आलेल्या आदेशाला अनुसरून या पोटकलमाच्या उपबंधानुसार त्या ठिकाणी खाद्यपदार्थांच्या विक्रीची किंमत विनियमित करण्यात यावी असे निर्देशित करू शकेल.

(दोन) या पोटकलमाखाली काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे जास्तीतजास्त तीन महिने इतक्या कालावधीसाठी अंमलात राहील;

(तीन) या पोटकलमाखाली अधिसूचना काढण्यात आल्यानंतर कोणतीही व्यक्ती तीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रकारच्या खाद्यपदार्थांची याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक भागात पोटकलम (२) च्या खंड (च) ला अनुलक्षून काढण्यात आलेल्या आदेशाला अनुसरून विक्री करील त्याबाबतीत, विक्रेत्याला खालीलप्रमाणे किंमत देण्यात येईल :—

(क) जेव्हा या कलमाखाली खाद्यपदार्थांची काही नियंत्रित किंमत निश्चित करण्यात आलेली असल्यास त्या किंमतीशी सुसंगत किंमत संमत होते तेव्हा, ती संमत किंमत;

(ख) जेव्हा असे कोणतेही मतैक्य होऊ शकत नाही तेव्हा, काही नियंत्रित किंमत असल्यास तिच्या संबंधात परिगणना करून ठरविण्यात आलेली किंमत;

(ग) जेव्हा खंड (क) आणि खंड (ख) यांतील कोणताही खंड लागू होत नसेल तेव्हा अधिसूचनेच्या दिनांकाच्या लगतपूर्व तीन महिन्यांच्या कालावधीत त्या स्थानिक भागात प्रचलित असलेल्या सरासरी बाजारभावाच्या संदर्भात परिगणना करून ठरविण्यात आलेली किंमत;

(चार) खंड (तीन) चा उपखंड (ग) याच्या प्रयोजनार्थ त्या स्थानिक भागातील प्रचलित बाजारभाव केंद्र शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून त्या स्थानिक भागाच्या किंवा त्याच्या शेजारच्या स्थानिक भागाच्या संबंधात ज्या प्रचलित बाजारभावाबद्दलची प्रकाशित आकडेवारी उपलब्ध असेल त्यांच्या संदर्भात निश्चित करण्यात येईल आणि असा निश्चित करण्यात आलेला सरासरी बाजारभाव अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात तो प्रश्नास्पद करता येणार नाही.

[2][(३ख) जेव्हा पोटकलम (२) च्या खंड (च) ला अनुलक्षून काढण्यात आलेल्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीने ज्यांच्या संबंधात कलम (३क) खाली अधिसूचना काढलेली नाही, अगर अशी अधिसूचना काढली जाऊन ती अंमलात असण्याचे बंद झाले आहे अशी अमुक दर्जाची किंवा प्रकारची अन्नधान्य, खाद्य तेलबिया, खाद्य तेले केंद्र शासनाला किंवा राज्यशासनाला किंवा त्या शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याला किंवा प्रतिनिधीला विकणे आवश्यक असते तेव्हा,—

(क) अशा दर्जांचे आणि प्रकाराचे अन्नधान्य, खाद्य तेलबिया, किंवा खाद्य तेले यांबाबत या कलमाखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली काही ठरविण्यात आली असल्यास ती नियंत्रित किंमत;

(ख) एकंदर पीक-उत्पादनाचे भवितव्य;

(ग) अशा दर्जाची किंवा प्रकारची अन्नधान्ये, खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले ग्राहकांना विशेषत: ग्राहकांपैकी दुर्बल वर्गांना वाजवी किंमतीत उपलब्ध करून देण्याची गरज;

(घ) संबंधित दर्जाची किंवा प्रकारची अन्नधान्य, खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले यांच्या किंमतीबाबत 'कृषिविषयक किंमत आयोगा' च्या काही शिफारशी असल्यास;

त्या शिफारशी लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या पूर्व मान्यतेने राज्य शासनाने अशी अन्नधान्य, खाद्य तेलबिया किंवा, प्रकरणपरत्वे, खाद्य तेले यांसाठी विनिर्दिष्ट केलेल्या प्रापण-किंमती एवढी रक्कम, पोटकलम (३) मध्ये याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, संबंधित व्यक्तीला देण्यात येईल.]

---

१. १९५७ चा अधिनियम १३, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आला.
२. १९७६ चा अधिनियम ९२, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले.

१[(३ग) जेव्हा पोट-कलम (२) च्या खंड (ख) खाली काढण्यात आलेल्या आदेशानुसार एखाद्या उत्पादकास, कोणत्याही प्रकारची साखर विकणे (—मग ते केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला असो, अशा शासनाचा अधिकारी किंवा प्रतिनिधी याला असो वा अन्य व्यक्ती किंवा व्यक्तिवर्ग यांना असो—) भाग असेल आणि एकतर पोट-कलम (३क) खाली अशा साखरेबाबत अधिसूचना काढण्यात आली नसेल किंवा काढण्यात आलेली अशी अधिसूचना तिचा कालावधी लोटून गेल्यामुळे अंमलात असण्याचे बंद झाले असेल तेव्हा—

(क) केंद्र शासनाने या कलमाखाली ऊसासाठी काही निश्चित केली असल्यास, अशी किमान किंमत;

(ख) साखरेचा निर्मिती-खर्च;

(ग) त्यावर भरलेले किंवा प्रदेय असे काही असल्यास, ते शुल्क किंवा कर; आणि

(घ) साखर-निर्मितीच्या धंद्यात घातलेल्या भांडवलावर वाजवी प्राप्ती मिळण्याची निश्चिती करणे,

या गोष्टी लक्षात घेऊन, केंद्र शासन आदेशाद्वारे साखरेची जी किंमत ठरवील अशा किंमतीच्या संदर्भात परिगणना करून ठरविण्यात येईल अशी रक्कम, पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या उत्पादकाला देण्यात येईल;

आणि वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी किंवा वेगवेगळ्या कारखान्यांसाठी किंवा वेगवेगळ्या प्रकारच्या साखरेसाठी वेगवेगळ्या किंमती वेळोवेळी निश्चित केल्या जातील.

स्पष्टीकरण.—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "उत्पादक" याचा अर्थ, साखर निर्मितीचा धंदा करणारी व्यक्ती असा आहे.]

(४) जर एखाद्या अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन व पुरवठा चालू ठेवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, ते आदेशाद्वारे एखाद्या व्यक्तीला (यात यापुढे "प्राधिकृत नियंत्रक" म्हणून निर्दिष्ट) त्या वस्तूचे उत्पादन व पुरवठा यामध्ये गुंतलेला असा जो कोणताही उपक्रम त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा संपूर्ण उपक्रमाच्या किंवा त्याच्या भागाच्या बाबतीत त्या आदेशामध्ये उपबंधित करण्यात येतील असे नियंत्रणविषयक कार्याधिकार वापरण्यास प्राधिकृत करू शकेल, आणि कोणताही उपक्रम किंवा त्याचा भाग याबाबत असा आदेश अंमलात असेपावेतो—

(क) प्राधिकृत नियंत्रक हा केंद्र शासनाने त्याला दिलेल्या कोणत्याही आदेशानुसार आपले कार्याधिकार वापरील, तथापि त्यायोगे, आदेशामध्ये जेवढे स्पष्टपणे उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, त्यास उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा प्रभार असणाऱ्या व्यक्तींचे कार्याधिकार ठरवून देणाऱ्या कोणत्याही अधिनियमितीच्या किंवा संलेखाच्या उपबंधाशी विसंगत असा कोणताही निदेश देण्याचा कोणताही अधिकार असणार नाही; आणि

(ख) आदेशाच्या उपबंधान्वये प्राधिकृत नियंत्रकाने दिलेल्या कोणत्याही निदेशानुसार उपक्रम किंवा त्याचा भाग चालवला जाईल, आणि त्या उपक्रमाच्या किंवा भागाच्या संबंधात कोणतेही व्यवस्थापनविषयक कार्याधिकार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अशा कोणत्याही निदेशाचे अनुपालन करावे लागेल.

२* * * * * *

(५) या कलमाखाली दिलेला कोणताही आदेश—

(क) सर्वसाधारण स्वरूपाचा किंवा एखाद्या व्यक्तिवर्गावर परिणाम करणारा असल्यास त्याबाबतीत, तो शासकीय राजपत्रात अधिसूचित केला जाईल; आणि

(ख) एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीला उद्देशून दिलेला असल्यास त्याबाबतीत, तो आदेश त्या व्यक्तीवर—

(एक) तो त्या व्यक्तीला सुपूर्द करून किंवा देऊ करून, किंवा

(दोन) याप्रमाणे तिला तो सुपूर्द करणे किंवा देऊ करणे शक्य नसेल तर, ती व्यक्ती जेथे राहते त्या परिवास्तूच्या बाहेरच्या दरवाज्यावर किंवा त्या परिवास्तूच्या अन्य एखाद्या ठळक भागी लावून आणि त्याबाबत लेखी प्रतिवृत्त तयार करून शेजारी राहणाऱ्या दोन व्यक्तींची त्यावर साक्ष घेऊन,

बजावला जाईल.

(६) केंद्र शासनाने किंवा केंद्र शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने या कलमाखाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवला जाईल.

---

१. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२. १९६७ चा अधिनियम १४, कलम ३ द्वारे घातलेली कलम ३ ची पोटकलमे (४क), (४ख) व (४ग) ही १९७४ चा अधिनियम ५६, कलम २ व अनुसूची एक यद्वारे निरसित करण्यात आली (३१ मार्च, १९६८ रोजी व तेव्हापासून).

राज्यशासन, इत्यादींना अथवा त्यांचे अधिकारी किंवा प्राधिकरण यांना उद्देशून दिलेले, अशा कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याविषयीचे किंवा अशी कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याविषयीचे निदेश अंतर्भूत असू शकतील.

४. कलम ३ खाली काढण्यात आलेला कोणताही आदेश, केंद्र शासन किंवा राज्य शासन अथवा केंद्र शासनाचे किंवा राज्य शासनाचे अधिकारी आणि प्राधिकरणे यांना अधिकार प्रदान करू शकेल आणि कर्तव्ये नेमून देऊ शकेल, आणि त्यामध्ये, कोणत्याही राज्य शासनाला अथवा देणे, इ. त्याचे अधिकारी किंवा प्राधिकरण यांना उद्देशून दिलेले, अशा कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याविषयीचे किंवा अशी कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याविषयीचे निदेश अंतर्भूत असू शकतील.

अधिकारांचे प्रत्यायोजन.

५. केंद्र शासन अधिसूचित आदेशाद्वारे असे निदेशित करू शकेल की, [१][कलम ३ खाली आदेश देण्याचा किंवा अधिसूचना काढण्याचा अधिकार] निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा बाबींच्या संबंधात आणि विनिर्दिष्ट असल्यास, तशा शर्तींच्या अधीनतेने, निदेशात विनिर्दिष्ट असेल —

(क) असा केंद्र शासनाचा दुय्यम अधिकारी किंवा प्राधिकरण, अथवा

(ख) असे राज्य शासन किंवा एखाद्या राज्य शासनाचा असा दुय्यम अधिकारी किंवा प्राधिकरण,

यानेही वापरण्याजोगी असेल.

इतर अधिनियमितींशी विसंगत अशा आदेशांचा परिणाम.

६. कलम ३ खाली काढण्यात आलेला कोणताही आदेश त्याच्याशी विसंगत असे काहीही या अधिनियमाहून अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा या अधिनियमाहून अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या आधारे परिणामक असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये अंतर्भूत असले तरी, परिणामक होईल.

अत्यावश्यक वस्तूचे अधिहरण करणे.

[२][६क. [३][(१)] [४][कोणतीही अत्यावश्यक वस्तू] तिच्या संबंधात कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार [५][अभिग्रहण करण्यात आली असेल तर,] ज्या जिल्ह्यात किंवा इलाखा शहरात अशा अत्यावश्यक वस्तूचे अभिग्रहण करण्यात आले असेल तेथील जिल्हाधिकाऱ्यास [६][अशा अभिग्रहणाचे वृत्त] गैरवाजवी विलंब न करता कळवावे लागेल आणि अशा आदेशाचे उल्लंघन झाल्याबद्दल खटला भरण्यात येवो वा न येवो—जिल्हाधिकारी, [७][जर त्याला तसे करणे समयोचित वाटले तर, याप्रमाणे अभिग्रहण केलेली ती अत्यावश्यक वस्तू आपणांपुढे तपासणीसाठी हजर करण्याचे निदेशित करू शकेल, आणि जर त्याची अशी खात्री झाली] की, आदेशाचे उल्लंघन झाले आहे तर, [४][तो—

(क) अशाप्रकारे अभिग्रहण केलेली अत्यावश्यक वस्तू ;

(ख) ज्यात अशी अत्यावश्यक वस्तू आढळली असेल असे कोणतेही आवेष्टन, आच्छादन किंवा पात्र; आणि

(ग) अशी अत्यावश्यक वस्तू वाहून नेण्यासाठी ज्याचा वापर करण्यात आला असेल असे कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान,

यांचे अधिहरण करण्याचा आदेश देऊ शकेल]:

परंतु, या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधान्वये करण्यात येईल अशा कोणत्याही कारवाईस बाध न येता, कोणतीही अन्नधान्ये किंवा खाद्य तेलबिया ही, त्यांच्या संबंधात कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार एखाद्या उत्पादकाकडून अभिग्रहण केली असून, जर अभिग्रहण केलेली अन्नधान्ये किंवा खाद्य तेलबिया त्याने उत्पादन केलेल्या असल्यास, त्यांचे या कलमान्वये अधिग्रहण करण्यात येणार नाही :

[८][परंतु, आणखी असे की, भाडे घेऊन मालाची किंवा प्रवाशांची वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणारे कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान याच्या बाबतीत, असे जनावर, वाहन, जलयान किंवा यान याद्वारे ज्या अत्यावश्यक वस्तूची वाहतूक करण्याचा प्रयत्न होता त्या वस्तूंच्या अधिहरणाऐवजी, तिच्या अभिग्रहणाच्या तारखेला असणाऱ्या तिच्या किमतीपेक्षा जास्त होणार नाही इतका द्रव्यदंड भरण्याचा विकल्पाधिकार असे जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान याच्या मालकाला देण्यात येईल.]

---

१. १९७१ चा अधिनियम ६६, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
२. १९६६ चा अधिनियम २५, कलम ३ द्वारे ६क, ६ख, ६ग आणि ६घ ही कलमे घातली.
३. १९७६ चा अधिनियम ९२, कलम ४ द्वारे कलम ६क ला त्याचे पोटकलम (१) म्हणून नवीन क्रमांक दिला.
४. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
५. १९७६ चा अधिनियम ९२, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
६. १९७६ चा अधिनियम ९२, कलम १ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
७. १९७४ चा अधिनियम ३०, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
८. १९७६ चा अधिनियम ९२, कलम ४ द्वारे हे परंतुक घातले.

[१][(२) जर पोटकलम (१) खाली अभिग्रहणाचे वृत्त मिळाल्यावर किंवा कोणत्याही अत्यावश्यक वस्तूची तपासणी केल्यावर जिल्हाधिकाऱ्याचे असे मत झाले की, ती अत्यावश्यक वस्तू लवकर व जास्त नाशिवंत आहे, किंवा अन्यथा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पुढील कृती समयोचित आहे, तर तो—

(एक) या अधिनियमाखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली अशा अत्यावश्यक वस्तूसाठी काही नियंत्रित किंमत निश्चित केली असल्यास, अशा किमतीला ती विकण्याचा आदेश देऊ शकेल ; अथवा

(दोन) अशी किंमत निश्चित केली नसेल तर, ती जाहीर लिलाव करून विकण्याचा आदेश देऊ शकेल :

[२][परंतु, केंद्र शासनाने किंवा एखाद्या राज्य शासनाने या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये ज्याची किरकोळ विक्रीची किंमत निश्चित केली असेल अशा कोणत्याही अत्यावश्यक वस्तूच्या बाबतीत, जिल्हाधिकारी, तिचे न्यायोचित वितरण व्हावे व ती रास्त भावात उपलब्ध व्हावी म्हणून, याप्रमाणे निश्चित केलेल्या किमतीला रास्त भावाच्या दुकानांतून ती विकण्यात यावी असा आदेश देऊ शकेल.]

(३) पूर्वोक्तानुसार कोणतीही अत्यावश्यक वस्तू विकण्यात येईल तेव्हा, तिच्या विक्रीचे उत्पन्न हे, त्यातून अशा विक्रीचा किंवा लिलावाचा खर्च अथवा त्यासंबंधीचा इतर आनुषंगिक खर्च वजा करून,—

(क) जिल्हाधिकाऱ्याने अखेरीस अधिहरणाचा आदेश काढला असेल तर,

(ख) कलम ६ग च्या पोटकलम (१) खाली अपीलान्ती काढलेल्या आदेशाद्वारे तसे आवश्यक केले असेल तर, किंवा

(ग) या कलमाखाली ज्याबाबत अधिहरणाचा आदेश काढला असेल त्या आदेशाच्या उल्लंघनाबद्दल भरलेल्या खटल्यात, संबंधित व्यक्ती दोषमुक्त करण्यात आली असेल तर,

मालकाला किंवा ज्या व्यक्तीकडून ती वस्तू अभिग्रहण करण्यात आली त्या व्यक्तीला देण्यात येईल.]

अत्यावश्यक वस्तूचे अधिहरण करण्यापूर्वी "कारणे दाखवा" नोटीस काढणे.

६ख. [३][(१)]कलम ६क खाली [४][कोणत्याही [५][अत्यावश्यक वस्तूचे, आवेष्टनाचे, आच्छादनाचे, पात्राचे, जनावराचे, वाहनाचे, जलयानाचे किंवा अन्य यानाचे]]अधिहरण करण्याबाबतचा आदेश, अशा [५][अत्यावश्यक वस्तूच्या, आवेष्टनाच्या, आच्छादनाच्या, पात्राच्या, जनावराच्या, वाहनाच्या, जलयानाच्या किंवा अन्य यानाच्या] मालकाला अथवा जिच्याकडून [६][ती अभिग्रहण करण्यात आली असेल] त्या व्यक्तीला—

(क) ज्या कारणांवरून [५][अत्यावश्यक वस्तूचे, आवेष्टनाचे, आच्छादनाचे, पात्राचे, जनावराचे, वाहनाचे, जलयानाचे किंवा अन्य यानाचे ] अधिहरण करण्यात येत आहे ती कारणे कळविणारी लेखी नोटीस देण्यात आल्याशिवाय ;

(ख) अधिहरणाच्या कारणाविरुद्ध, नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट असेल अशा वाजवी मुदतीत लेखी अभिवेदन करण्याची संधी दिल्याशिवाय; आणि

(ग) त्याबाबतीत त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, काढला जाणार नाही.

[७][(२) जर कोणत्याही जनावराच्या, वाहनाच्या, जलयानाच्या किंवा अन्य यानाच्या मालकाने आपल्या स्वतःच्या, त्याचा कोणताही एजंट असल्यास त्या एजंटाच्या आणि असे जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान ताब्यात असणाऱ्या व्यक्तीच्या नकळत त्या जनावराचा, वाहनाचा, जलयानाचा किंवा त्या अन्य यानाचा अत्यावश्यक वस्तूची ने-आण करण्यासाठी वापर करण्यात आला होता, किंवा असा वापर उक्त मालक, एजंट आणि उक्त व्यक्ती यांच्या मूकानुमतीने झाला नव्हता, आणि तसेच त्यापैकी प्रत्येकाने असा वापर करण्यात येऊ नये म्हणून सर्व वाजवी व आवश्यक असे सावधगिरीचे उपाय योजले होते असे, जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल. अशा रीतीने,

---

१. १९७६ चा अधिनियम ९२, कलम ४ द्वारे घातले.

२. १९८१ चा अधिनियम १८, कलम ४ द्वारे मूळ परंतुकाऐवजी दाखल केले.

३. १९७४ चा अधिनियम ३०, कलम ५ द्वारे कलम ६ख याला त्याचे पोटकलम (१) म्हणून नवीन क्रमांक दिला.

४. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

५. १९७४ चा अधिनियम ३०, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

६. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

७. १९७४ चा अधिनियम ३०, कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आला (२२ जून, १९७४ रोजी व तेव्हापासून).

सिद्ध करून दाखवले तर त्या बाबतीत, पोटकलम (१) च्या उपबंधास बाध न येता, ते जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान यांचे कलम ६क अन्वये अधिहरण करण्याविषयी कोणताही आदेश काढण्यात येणार नाही. ]

[1][ (३) कोणतीही अत्यावश्यक वस्तू, आवेष्टन, आच्छादन, पात्र, जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान अधिहरण करण्याचा आदेश काढण्यापूर्वी, पोटकलम (१) च्या खंड (क) खाली नोटीस देताना जर त्या खंडातील उपबंधाचे सारत: पालन झाले असेल तर, एरव्ही त्या नोटिशीत काही उणीव राहिली वा गैरनियम बाब झाली म्हणून तेवढ्या कारणाबरून तो आदेश विधिबाह्य ठरणार नाही. ]

६ग. (१) कलम ६क खाली काढण्यात आलेल्या अधिहरणाच्या आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश तिला कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत संबंधित [2][राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि राज्य शासन], अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, स्वत:स योग्य वाटेल त्याप्रमाणे, ज्याच्याविरुद्ध अपील करण्यात आले आहे तो आदेश कायम करणारा, त्यात आपरिवर्तन करणारा किंवा तो रद्दबातल करणारा असा आदेश काढील.

(२) जेव्हा कलम ६क खालील आदेश [3][त्या राज्य शासनाकडून] आपरिवर्तित किंवा रद्दबातल करण्यात आला असेल अथवा ज्या आदेशाच्या संबंधात कलम ६क खाली अधिहरणाचा आदेश देण्यात आला आहे त्या आदेशाचे व्यतिक्रमण केल्याबद्दल सुरू करण्यात आलेल्या अभियोगात निबद्ध असलेल्या व्यक्तीला दोषमुक्त करण्यात आले असेल आणि दोन्ही प्रकरणी [4][अभिग्रहण करण्यात आलेली अत्यावश्यक वस्तू कोणत्याही कारणास्तव परत करता येणे] शक्य नसेल तर, [4][ती अत्यावश्यक वस्तू जणू काही] शासनाला विकण्यात आलेली असावी त्याप्रमाणे [1][अशा व्यक्तींना कलम ६क च्या पोटकलम (३) मध्ये उपबंधित केलेले खेरीजकरून एरव्ही,] तिची किंमत, [5][त्या अत्यावश्यक वस्तूच्या] अभिग्रहणाच्या दिवसापासून परिगणना करून ठरवलेल्या बाजवी व्याजासहित देण्यात येईल [1][आणि अशी किंमत—

(एक) अन्नधान्ये, खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले यांच्या बाबतीत, कलम ३, पोटकलम (३ख) च्या उपबंधांनुसार ;

(दोन) साखरेच्या बाबतीत, कलम ३, पोटकलम (३ग) च्या उपबंधांनुसार; आणि

(तीन) अन्य कोणत्याही अत्यावश्यक वस्तूच्या बाबतीत, कलम ३, पोटकलम (३) च्या उपबंधांनुसार,

ठरवली जाईल. ];

**अधिहरणाचा निवाडा इतर शिक्षांच्या आड यावयाचा [1] नाही.**

६घ. या अधिनियमाखाली जिल्हाधिकाऱ्याने अधिहरणाचा निवाडा दिला म्हणून, त्यामुळे बाधित झालेल्या व्यक्तीला, या अधिनियमाखाली ती व्यक्ती ज्या कोणत्याही शिक्षेला पात्र असेल ती शिक्षा ठोठावली जाण्यास प्रतिबंध होणार नाही. ]

**विवक्षित प्रकरणी अधिकारितेला आडकाठी.**

[6][६ङ. जेव्हा केव्हा एखादी अत्यावश्यक वस्तू तिच्यासंबंधात कलम ३ खाली काढण्यात आलेल्या आदेशाला अनुसरून अभिग्रहण करण्यात आली असेल किंवा ज्यात अशी अत्यावश्यक वस्तू आढळली असेल असे कोणतेही पुडके, पाकीट किंवा पात्र किंवा अशी अत्यावश्यक वस्तू वाहून नेण्यासाठी वापरलेला कोणताही प्राणी, वाहन, जहाज किंवा अन्य वाहन याचे कलम ६क खाली अधिहरण होईतोपर्यंत अभिग्रहण करण्यात आले असेल तेव्हा अशा अत्यावश्यक वस्तूचा, पुडक्याचा, पाकिटाचा, पात्राचा, प्राण्याचा, वाहनाचा, जहाजाचा किंवा अन्य वाहनाचा कब्जा, सुपूर्दगी, विल्हेवाट किंवा वितरण यासंबंधी आदेश काढण्याची अधिकारिता जिल्हाधिकाऱ्याला किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ६ग अन्वये संबंधित राज्य शासनाला असेल आणि त्या त्या काळी अंमलात आलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात विरुद्ध असे काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय, अधिकरण किंवा अन्य प्राधिकरण यांना ती अधिकारिता असणार नाही. ]

---

१. १९७६ चा अधिनियम ९२, कलम ५ द्वारे घातले.

२. १९८१ चा अधिनियम १८, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

३. १९८१ चा अधिनियम १८, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

४. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ६ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे "वस्तूंच्या" या ऐवजी घातले.

६. १९८६ चा अधिनियम ४२, कलम ६ङ ऐवजी हे कलम दाखल केले.

७. [१][(१) जर कोणत्याही व्यक्तीने कलम ३ खाली काढण्यात आलेल्या आदेशाचे व्यतिक्रमण केले तर,— शिक्षा.

(क) ती व्यक्ती—

(एक) त्या कलमाच्या पोटकलम (२) च्या खंड (ज) किंवा (झ) ला अनुलक्षून दिलेल्या आदेशाच्या बाबतीत, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल ; आणि

(दोन) अन्य कोणत्याही आदेशाच्या बाबतीत, तीन महिन्यांहून कमी नसेल परंतु, सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल :

[२]* * * * * *

(ख) जिच्याबाबत आदेशाचे व्यतिक्रमण झाले असेल अशी कोणतीही मालमत्ता जप्त होऊन शासनाकडे जमा होईल ;

(ग) ज्यामध्ये मालमत्ता आढळली ते आवेष्टन, आच्छादन किंवा पात्र आणि मालमत्तेच्या ने-आणीसाठी वापरण्यात आलेले कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान हे, न्यायालयाने तसा आदेश दिल्यास, जप्त होऊन शासनाकडे जमा होईल.

(२) कलम ३ च्या पोटकलम (४) मधील खंड (ख) खाली ज्या कोणत्याही व्यक्तीला निदेश दिलेला असेल ती व्यक्ती त्या निदेशाचे अनुपालन करण्यास चुकली तर, तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल व सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही ती पात्र होईल ;

[२]* * * * * *

(२क) पोटकलम (१), खंड (क) चा उपखंड (दोन) याअन्वये किंवा पोटकलम (२) अन्वये एखाद्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली कोणतीही व्यक्ती त्याच उपबंधाखालील अपराधाबद्दल पुन्हा सिद्धदोष ठरली असेल तर, ती व्यक्ती दुसऱ्या व त्यानंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल सहा महिन्यांहून कमी नसेल परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल;

[२]* * * * * *

[२]* * * * * *]

[३][(३) एखादी व्यक्ती पोटकलम (१) खालील अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली असून जर अत्यावश्यक वस्तूबाबत आदेशाचे व्यतिक्रमण केल्याबद्दल त्याच पोटकलमाखाली ती पुन्हा सिद्धदोष ठरली असेल तर, ज्या न्यायालयाने तिला सिद्धदोष ठरवले ते न्यायालय त्या पोटकलमाखाली देण्यात येईल अशा कोणत्याही दंडाव्यतिरिक्त, आदेशाद्वारे, त्या व्यक्तीने आदेशात न्यायालयाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे किमान सहा महिने इतक्या कालावधीत त्या अत्यावश्यक वस्तूच्या संबंधात कोणताही व्यापारधंदा चालवू नये असे निदेशित करील. ]

[४][७क. (१) जेव्हा— विवक्षित रकमा जमीन-महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

(क) कलम ३ अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशानुसार कोणतीही रक्कम भरण्यास, किंवा

(ख) त्या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे किंवा त्यानुसार स्थापन केलेल्या कोणत्याही लेख्याच्या किंवा निधीच्या जमाखाती कोणतीही रक्कम अनामत ठेवण्यास दायी असलेली कोणतीही व्यक्ती अशी संपूर्ण रक्कम किंवा तिचा काही अंश भरण्यात किंवा अनामत ठेवण्यात कोणतीही कसूर करील तेव्हा, ज्या रकमेच्या बाबतीत अशी कसूर करण्यात आली असेल ती रक्कम [मग असा आदेश 'अत्यावश्यक वस्तू (विशोधन) अधिनियम, १९८४' च्या प्रारंभापूर्वी
१९८४ चा ३४. किंवा नंतर दिलेला असो, आणि अशी रक्कम भरण्याचे किंवा अनामत ठेवण्याचे अशा व्यक्तीवरील दायित्व अशा प्रारंभापूर्वी किंवा नंतर निर्माण झालेले असो] जमीन-महसुलाची थकबाकी म्हणून शासनाला अशा कसुरीच्या दिनांकापासून ते अशा रकमेच्या वसुलीच्या दिनांकापर्यंत दरसाल दरशेकडा [५][पंधरा] दराने तीवर देय होणाऱ्या सरळ व्याजासहित वसूल करता येण्यासारखी असेल.

---

१. १९७४ चा अधिनियम ३०, कलम ६ द्वारे पोटकलमे (१) व (२) याऐवजी ही पोटकलमे दाखल करण्यात आली (२२ जून, १९७४ रोजी व तेव्हापासून).
२. १९८१ चा अधिनियम १८, कलम ७ द्वारे वगळले.
३. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ७ द्वारे समाविष्ट करण्यात आले.
४. १९८४ चा अधिनियम ३४, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ जुलै, १९८४ रोजी व तेव्हापासून).
५. १९८६ चा अधिनियम ४२, कलम ३ द्वारे "सहा" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोटकलम (१) अन्वये वसूल केलेल्या रकमेबाबत अशी रक्कम परत करण्याचे किंवा अनामत ठेवण्याचे दायित्व ज्या आदेशान्वये निर्माण झाले त्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये किंवा विरुद्ध अशा कोणत्याही संविदेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालय, अधिकरण किंवा अन्य प्राधिकरण पोटकलम (१) च्या उपबंधानुसार जमीन-महसुलाची थकबाकी म्हणून कोणतीही रक्कम वसूल करण्यापासून कोणत्याही शासनास मनाई करणारा किंवा निरुद्ध करणारा कोणताही व्यादेश देणार नाही किंवा आदेश काढणार नाही.

(४) ज्या आदेशानुसार पोटकलम (१) खालील जमीन-महसुलाची थकबाकी म्हणून कोणतीही रक्कम शासनाने वसूल केलेली असेल तो आदेश सक्षम न्यायालयाने शासनाला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर विधिबाह्य असल्याचे घोषित केले तर, याप्रमाणे वसूल केलेली रक्कम ज्या व्यक्तीकडून रक्कम वसूल केली होती त्या व्यक्तीला शासन अशा रकमेच्या वसुलीच्या दिनांकापासून ते अशी रक्कम परत करावयाच्या दिनांकापर्यंत दरसाल दरशेकडा सहा दराने तीवर देय होणाऱ्या सरळ व्याजासहित परत देईल.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या प्रयोजनार्थ "शासन" याचा अर्थ, कलम ३ खालील संबंधित आदेश ज्याने काढला ते शासन अथवा कोणत्याही शासनास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने, किंवा प्राधिकरणाने असा आदेश काढला असेल तेथे ते शासन असा आहे].

प्रयत्न आणि अपप्रेरण. ८. जी व्यक्ती कलम ३ खाली दिलेल्या आदेशाचे व्यतिक्रमण करण्याचा प्रयत्न करील किंवा व्यतिक्रमण करण्यास अपप्रेरणा देईल अशा कोणत्याही व्यक्तीने त्या आदेशाचे व्यतिक्रमण केले असल्याचे मानले जाईल :

[1][परंतु, कलम २ च्या खंड (क्) चा उपखंड (चार-क्) किंवा उपखंड (पाच) मध्ये नमूद केलेल्या स्वरूपाची कोणतीही अत्यावश्यक वस्तू अशा अत्यावश्यक वस्तूचा धंदा किंवा व्यापार करण्यासाठी नव्हे तर स्वतःच्या वापरासाठी किंवा स्वतःच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या किंवा आपणांवर अवलंबून असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींच्या वापरासाठी प्राप्त करण्याच्या प्रयोजनार्थ काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करण्यास एखाद्या व्यक्तीने अपप्रेरणा दिली असेल अशा बाबतीत, कलम ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि न्यायालय न्यायनिर्णयात कारणे नमूद करून त्या कारणास्तव फक्त दंडाची शिक्षा देऊ शकेल.]

खोटे कथन. ९. जर कोणतीही व्यक्ती—

(एक) कलम ३ खाली देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे कोणतेही कथन करण्यास किंवा कोणतीही माहिती सादर करण्यास तिला फर्मावण्यात आले असताना, कोणत्याही महत्वाच्या तपशिलाबाबत जे खोटे आहे अथवा जे खोटे असल्याचे तिला माहीत आहे किंवा तसे समजण्यास तिला वाजवी कारण आहे अथवा जे खरे आहे असा तिचा समज नाही असे कथन करील किंवा अशी माहिती देईल तर, किंवा

(दोन) अशा आदेशानुसार तिने जे कोणतेही पुस्तक, हिशेब, अभिलेख, अधिकथन, विवरण किंवा अन्य दस्तऐवज ठेवणे किंवा सादर करणे आवश्यक आहे त्यामध्ये पूर्वोक्तानुसार असे कोणतेही कथन करील तर,

ती [2][पाच वर्षापर्यंत] असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

कंपन्यांनी केलेले अपराध. १०. (१) कलम ३ खाली दिलेल्या आदेशाचे व्यतिक्रमण करणारी व्यक्ती जर एखादी कंपनी असेल तर, आदेशाचे व्यतिक्रमण झाले त्यावेळी जी कंपनीची हुकूमतदार असेल आणि कंपनीच्या कामकाज चालविण्याबद्दल तिला जबाबदार असेल अशी प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही व्यतिक्रमणाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि विरुद्ध कारवाई केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास ती पात्र होईल :

परंतु, जर अशा कोणत्याही व्यक्तीने व्यतिक्रमण आपल्या नकळत घडले किंवा असे व्यतिक्रमण होऊ नये यासाठी आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे शाबीत केले तर, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

---

१. १९८१ चा अधिनियम १८, कलम ८ द्वारे घातले.

२. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ८ द्वारे, "तीन वर्षापर्यंत" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केलेला असून तो कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, कार्यवाह किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने करण्यात आला आहे अथवा त्यांच्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, कार्यवाह किंवा अन्य अधिकारी हेसुद्धा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास ते पात्र होतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ—

(क्) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय असा आहे आणि त्यात, पेढी किंवा अन्य व्यक्ती-संघ यांचा समावेश आहे;

(ख्) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

१९७४ चा २. [1][१०क. [2]['फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३'] यात काहीही असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला प्रत्येक अपराध हा दखलपात्र [3]* * * * [4][आणि बिनजामिनी] असेल.] अपराध दखलपात्र आणि बिनजामिनी असणे.

[5][१०ख. (१) कोणतीही कंपनी या अधिनियमान्वये सिद्धदोष ठरली असेल त्याबाबतीत, अशा कंपनीला सिद्धदोष ठरवणाऱ्या न्यायालयास, अशा कंपनीचे नाव व त्या कंपनीच्या कामकाजाचे ठिकाण, तिने केलेल्या उल्लंघनाचे स्वरूप, कंपनीला अशा रीतीने सिद्धदोष ठरविण्यात आले आहे ही वस्तुस्थिती आणि प्रकरणाच्या वस्तुस्थितीनुरूप न्यायालयास योग्य वाटेल असा इतर तपशील न्यायालय निदेश देईल अशा वृत्तपत्रात व अशा इतर रीतीने कंपनीच्या खर्चाने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार असेल. या अधिनियमान्वये सिद्धदोष ठरलेल्या कंपन्यांचे नाव, धंद्यांचे ठिकाण, इत्यादी प्रसिद्ध करण्याचा न्यायालयाचा अधिकार.

(२) न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील करावयाच्या मुदतीत कोणतेही अपील करण्यात न येता अशा कालावधी संपेतोपर्यंत किंवा असे अपील करण्यात आले असल्यास ते निकालात निघतोपर्यंत, पोटकलम (१) खालील माहिती प्रसिद्ध केली जाणार नाही.

(३) पोटकलम (१) अन्वये माहिती प्रसिद्ध करण्यास येणाऱ्या खर्चाची रक्कम ही जणू न्यायालयात केलेल्या द्रव्यदंडाची रक्कम आहे असे समजून ती कंपनीकडून वसूल करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ "कंपनी" या शब्दाचा अर्थ, कलम १० च्या स्पष्टीकरणातील खंड (क्) यात त्या शब्दास जो अर्थ दिला असेल त्या अर्थाप्रमाणेच असेल.]

[6][१०ग. (१) ज्या अपराधांच्या बाबतीत आरोपीची मानसिक अवस्था दोषार्ह असणे आवश्यक असेल अशा, या अधिनियमाखालील अपराधाच्या बाबतीतील कोणत्याही खटल्यात न्यायालय अशी मानसिक अवस्था होती असे गृहीत धरील. परंतु त्या खटल्यात जी कृती अपराध म्हणून आरोपित करण्यात आली असेल अशा कोणत्याही कृतीच्या बाबतीत आपली कोणत्याही प्रकारे अशी दोषार्ह मानसिक अवस्था नव्हती हे सिद्ध करून आरोपीला आपला बचाव करता येईल. आरोपींची मानसिक अवस्था दोषार्ह असल्याचे गृहीत धरणे.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील "दोषार्ह मानसिक अवस्था" या शब्दप्रयोगात उद्देश, हेतू, वस्तुस्थिती माहीत असणे आणि वस्तुस्थितीवर विश्वास ठेवणे किंवा विश्वास ठेवण्यास कारण असणे या गोष्टींचा समावेश होतो.

(२) जेव्हा न्यायालय एखाद्या गोष्टीचे अस्तित्व पुरेसे शंकातीत असल्याचे मानील तेव्हाच ती गोष्ट या कलमाच्या प्रयोजनार्थ सिद्ध झाली आहे असे समजले जाईल—केवळ अशा गोष्टीचे अस्तित्व दाट संभाव्यतेमुळे प्रस्थापित होते म्हणून नव्हे.]

१८६० चा ४५. ११. कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबाबत 'भारतीय दंड संहिता'—कलम २१ मधील व्याख्येनुसार लोक सेवक असलेल्या एखाद्या व्यक्तीने [7][किंवा अपराधांची दखल घेणे.

---

१. १९६७ चा अधिनियम ३६, कलम ९ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. १९७४ चा अधिनियम ३०, कलम ७ द्वारे "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
(२२ जून, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे "आणि जामीनपात्र" हा मजकूर वगळण्यात आला.
(२२ जून, १९७४ रोजी व तेव्हापासून).

४. १९८१ चा अधिनियम १८, कलम ९ द्वारे घातले. (१ सप्टेंबर, १९८२ रोजी व तेव्हापासून).

५. १९७४ चा अधिनियम ३०, कलम ८ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (२२ जून, १९७४ रोजी व तेव्हापासून).

६. १९७४ चा अधिनियम ३०, कलम ८ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले. (२२ जून, १९७४ रोजी व तेव्हापासून).

७ १९८६ चा अधिनियम ७३ द्वारे समाविष्ट केले. (१ मे, १९८७ रोजी व तेव्हापासून).

कोणत्याही व्यथित व्यक्तीने–मग अशी व्यक्ती उपभोक्ता अधिसंघाची सदस्य असो अथवा नसो–किंवा त्या मान्यताप्राप्त उपभोक्ता अधिसंघाने] अशा अपराधाच्या घटकतथ्यांसंबंधी लेखी अहवाल सादर केल्याखेरीज दखल घेणार नाही.

[1][**स्पष्टीकरण.**––या कलमाच्या आणि कलम १२ कक च्या प्रयोजनार्थ, "मान्यताप्राप्त उपभोक्ता अधिसंघ" याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये नोंदणी झालेला स्वेच्छा उपभोक्ता अधिसंघ असा आहे.]

[2]* * * * *

खास न्यायालयांची स्थापना. [3][१२क. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाखालील अपराधांची शीघ्र न्यायचौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा अशा क्षेत्रांसाठी आवश्यक असतील तितकी खास न्यायालये स्थापन करता येतील.

(२) खास न्यायालय हे एकाच न्यायाधीशाचे असेल व राज्य शासनाने केलेल्या विनंतीनुसार उच्च न्यायालय त्या न्यायाधीशास नियुक्त करील.

**स्पष्टीकरण.**––या पोटकलमामध्ये "नियुक्ती करणे" या शब्दप्रयोगाला, संहितेच्या कलम ९ च्या स्पष्टीकरणामध्ये त्याला देण्यात आल्याप्रमाणे तोच अर्थ असेल.

(३) एखादी व्यक्ती,––

(क) ती उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्ह आहे, किंवा

(ख) ती किमान एक वर्ष इतका काळ सत्र न्यायाधीश किंवा अपर सत्र न्यायाधीश म्हणून राहिलेली आहे,

असे झाल्याशिवाय खास न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त केली जाण्यास अर्ह होणार नाही.

खास न्यायालयांद्वारे न्याय-चौकशीयोग्य अपराध. १२कक. संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,––

(क) या अधिनियमाखालील सर्व अपराधांची न्यायचौकशी, तो अपराध ज्या क्षेत्रामध्ये करण्यात आला असेल त्या क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या खास न्यायालयालाच किंवा जेथे एकापेक्षा अधिक खास न्यायालये असतील तेथे, त्यापैकी उच्च न्यायालयाकडून याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका न्यायालयालाच करता येईल;

(ख) या अधिनियमाखालील अपराध केल्याचा आरोप असलेल्या किंवा तशा संशयित असलेल्या एखाद्या व्यक्तीला, संहितेचे कलम १६७ चे पोटकलम (२) किंवा पोटकलम (२क) अन्वये दंडाधिकाऱ्याकडे पाठवण्यात आले असेल अशा बाबतीत, असा दंडाधिकारी स्वत:ला योग्य वाटेल अशा हवालतीत अशा व्यक्तीला (असा दंडाधिकारी हा न्यायिक दंडाधिकारी असेल तर, जास्तीत जास्त पंधरा दिवसांच्या कालावधीसाठी आणि असा दंडाधिकारी हा कार्यकारी दंडाधिकारी असेल तर, जास्तीत जास्त सात दिवसांच्या कालावधीसाठी) स्थानबद्ध करून ठेवण्याचे प्राधिकृत करू शकेल :

परंतु, अशा दंडाधिकाऱ्याला जर––

(एक) अशी व्यक्ती उपरोक्ताप्रमाणे त्याच्याकडे पाठवण्यात आली असेल तेव्हा; किंवा

(दोन) त्याने प्राधिकृत केलेला स्थानबद्धतेचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा तो समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही वेळी;

असे वाटले की, अशा व्यक्तीची स्थानबद्धता अनावश्यक आहे व ही बाब कलम ८ च्या परंतुकाखाली येते याबाबत त्याची खात्री झाली तर, तो अशा व्यक्तीची जामिनावर मुक्तता करण्याचा आदेश देऊ शकेल आणि त्याची अशा प्रकारे खात्री न झाल्यास, तो अधिकारिता असलेल्या खास न्यायालयाकडे अशा व्यक्तीला पाठवण्यात यावे असा आदेश देईल;

(ग) खंड (ख) अन्वये खास न्यायालयाकडे पाठवलेल्या व्यक्तीच्या संबंधात खास न्यायालय, या पोटकलमाच्या खंड (घ) च्या उपबंधाच्या अधीनतेने, असाच अधिकार वापरू शकेल की, जो एखाद्या प्रकरणाची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असणाऱ्या दंडाधिकाऱ्याला संहितेच्या कलम १६७ अन्वये ज्या व्यक्तीला त्याच्याकडे पाठवण्यात आले आहे अशा आरोपी व्यक्तीच्या संबंधात त्या कलमान्वये अशा प्रकरणात वापरता येईल;

---

१. १९८६ चा अधिनियम कलम २ द्वारे भर घालण्यात आली. (१ मे, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९८१ चा अधिनियम १८, कलम १० द्वारे वगळले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ कलम १२ क ऐवजी ही कलमे दाखल केली.

(घ) उपरोक्तप्रमाणे असेल ते खेरीजकरून एरव्ही, या अधिनियमाखालील अपराध केल्याचा आरोप असलेल्या किंवा तशा संशयित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, खास न्यायालय किंवा उच्च न्यायालव यांच्याखेरीज इतर कोणत्याही न्यायालयाकडून जामिनावर सोडण्यात येणार नाही :

परंतु,—

(एक) अशा सुटकेच्या अर्जाला विरोध करण्याची संधी फिर्यादीपक्षाला दिल्याशिवाय,—मात्र अशी संधी देणे व्यवहार्य नाही असे काही कारणास्तव खास न्यायालयाचे मत असेल तर, त्याला ती कारणे नमूद करावी लागतील—; आणि

(दोन) फिर्यादीपक्षाने अर्जाला विरोध केला असेल अशा बाबतीत, ती व्यक्ती संबंधित अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यास वाजवी कारण आहे. याबाबत खास न्यायालयाची खात्री झाली तर,

खास न्यायालय अशा कोणत्याही व्यक्तीला जामिनावर सोडणार नाही :

परंतु, आणखी असे की, जर अशी व्यक्ती सोळा वर्षांपेक्षा कमी वयाची असेल किंवा ती स्त्री असेल किंवा ती आजारी किंवा दुर्बल व्यक्ती असेल तर अथवा इतर कोणत्याही विशेष कारणासाठी—ते लेखी नमूद करावे लागेल—तसे करणे न्याय्य आणि योग्य आहे याबाबत खास न्यायालयाची खात्री झाली असेल तर, अशा कोणत्याही व्यक्तीला जामिनावर सोडावे असे खास न्यायालय निदेशित करू शकेल ;

(ङ) या अधिनियमाखाली अपराध ठरेल अशा वस्तुस्थितीसंबंधीच्या पोलीस अहवालाचे अवलोकन केल्यावर [1][किंवा संबंधित शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या अधिकाऱ्याने] [2][किंवा कोणत्याही व्यथित व्यक्तीने मग अशी व्यक्ती त्या संघाचा सदस्य असो किंवा नसो—किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त उपभोक्ता अधिसंघाने तक्रार केल्यावर] खास न्यायालय, आरोपीला न्यायचौकशीसाठी त्याच्याकडे संप्रेषित करण्यात आलेले नसतानाही त्या अपराधांची दखल घेऊ शकेल ;

(च) या अधिनियमाखालील सर्व अपराधांची न्यायचौकशी संक्षिप्त रीत्या करण्यात येईल आणि संहितेची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) यांचे उपबंध, शक्य असेल तितपत, अशा न्याय चौकशीला लागू होतील :

परंतु, या कलमाखालील संक्षिप्त न्यायचौकशीअन्ती कोणतीही दोषसिद्धी झाल्यास त्या बाबतीत, खास न्यायालयाने जास्तीत जास्त दोन वर्षे इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा देणे कायदेशीर होईल.

(२) या अधिनियमाखालील अपराधाची न्यायचौकशी करताना या अधिनियमाखाली नसलेल्या अन्य अपराधाचीही न्यायचौकशी खास न्यायालयाला करता येईल, व संहितेअन्वये आरोपीवर त्याच न्यायचौकशीत तो दोषारोप ठेवता येईल :

परंतु, असा अन्य अपराध हा, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये संक्षिप्त न्यायचौकशीयोग्य असावा :

परंतु, आणखी असे की, अशा न्यायचौकशीतील अशा अन्य अपराधाबद्दल कोणतीही दोषसिद्धी झाल्यास त्या बाबतीत, अशा इतर कायद्याअन्वये संक्षिप्त न्यायचौकशीअन्ती होणाऱ्या दोषसिद्धीबद्दल जेवढ्या मुदतीच्या शिक्षेचा उपबंध केला असेल त्यापेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा खास न्यायालयाने ठोठावणे हे कायदेशीर होणार नाही.

(३) या अधिनियमाखालील अपराधात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निबद्ध असल्याबद्दल किंवा त्यात सामील असल्याबद्दल संशयित असलेल्या कोणत्याही इसमाचा साक्षीपुरावा मिळविण्याच्या हेतूने खास न्यायालय अशा व्यक्तीला त्या अपराधाच्या आणि तो करणारी मुख्य व्यक्ती म्हणून किंवा त्याला अपप्रेरणा देणारी व्यक्ती म्हणून संबंधित असलेल्या इतर प्रत्येक व्यक्तीच्या संबंधातील त्याला माहीत असलेल्या संपूर्ण परिस्थितीची संपूर्ण व खरी माहिती उघड करण्याच्या शर्तीवर माफी देऊ शकेल आणि अशा प्रकारे दिलेली प्रत्येक माफी, त्या संहितेच्या कलम ३०७ अन्वये दिली असल्याचे संहितेच्या कलम ३०८ च्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल.

---

१. १९८६ चा अधिनियम ४२, कलम ४ द्वारे समाविष्ट केले.

२. १९८६ चा अधिनियम ७३, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (१ मे १९८७ रोजी व तेव्हापासून).

(४) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे संहितेच्या कलम ४३९ खालील, जामिनाच्या संबंधातील उच्च न्यायालयाच्या विशेष अधिकारांवर परिणाम होतो असे मानण्यात येणार नाही, आणि उच्च न्यायालयाला त्या कलमातील "दंडाधिकारी" या निर्देशामध्ये जणू काही कलम १२क अन्वये स्थापन करण्यात आलेल्या "खास न्यायालया" च्या निर्देशाचा समावेश असावा त्याप्रमाणे त्या कलमाच्या पोटकलम (१) च्या खंड (ख) खालील अधिकारासकट अशा अधिकारांचा वापर करता येईल.

अपील व पुनरीक्षण. १२कख. उच्च न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील खास न्यायालय हे जणू काही त्या उच्च न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील प्रकरणांची न्यायचौकशी करणारे सत्र न्यायालय असावे त्याप्रमाणे ते उच्च न्यायालय संहितेची प्रकरणे एकोणतीस व तीस यांद्वारे उच्च न्यायालयाला प्रदान केलेले सर्व अधिकार, ते लागू असतील तेथवर, वापरू शकेल.

खास न्यायालयां-समोरील कार्यवाहींना संहिता लागू असणे. १२कग. या अधिनियमामध्ये अन्यथा उपबंध करण्यात आला असेल ते खेरीजकरून एरव्ही, संहितेचे उपबंध (जामीन आणि बंधपत्रे यासंबंधीच्या उपबंधासकट) खास न्यायालयांसमोरील कार्यवाहींनाही लागू होतील आणि उक्त उपबंधांच्या प्रयोजनांसाठी खास न्यायालय हे सत्र न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि खास न्यायालयासमोर फिर्यादीपक्षाचे काम चालविणारी व्यक्ती ही सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल.]

दिवाणी न्यायालयाने व्यादेश देणे, इत्यादी. [1][१२ख. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही आदेशान्वये केंद्र सरकारने किंवा कोणत्याही राज्य शासनाने किंवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने आपल्या पदीय नात्याने केलेल्या किंवा तसे म्हणून केलेल्या कोणत्याही कृतीविरुद्ध व्यादेश किंवा अन्य कोणताही अनुतोष मिळवण्यासाठी करण्यात आलेल्या अर्जाची नोटीस अशा सरकारास किंवा शासनास किंवा अशा अधिकाऱ्यास देण्यात आल्याशिवाय व येईतोपर्यंत कोणतेही दिवाणी न्यायालय अशा कृतीच्या संबंधात अशा सरकारविरुद्ध किंवा शासनाविरुद्ध किंवा अशा अधिकाऱ्याविरुद्ध व्यादेश देणार नाही किंवा अन्य कोणताही अनुतोष मंजूर करण्याविषयी आदेश काढणार नाही.]

आदेशांबाबत गृहीतक. १३. जर एखादा आदेश एखाद्या प्राधिकाऱ्याने या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली त्याला प्रदान करण्यात आलेला कोणताही अधिकार वापरुन काढलेला व स्वाक्षरित केलेला दिसत असेल तर, न्यायालय 'भारतीय पुरावा अधिनियम, १८७२' यामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे असा आदेश त्या प्राधिकाऱ्याने याप्रमाणे काढला होता असे गृहीत धरील. १८७२ चा १.

विवक्षित प्रकरणांत शाबितीचा भार. १४. कलम ३ खाली काढलेला जो कोणताही आदेश कायदेशीर प्राधिकाराशिवाय अथवा परवाना, लायसन किंवा अन्य दस्तऐवज याशिवाय एखादी कृती करण्यास किंवा एखादी वस्तू जवळ बाळगण्यास मना करतो त्याचे व्यतिक्रमण केल्याबद्दल एखाद्या व्यक्तीवर अभियोग लावण्यात आला असेल तर, तिच्याकडे असा प्राधिकार, परवाना, लायसन किंवा अन्य दस्तऐवज आहे हे करण्याचा भार तिच्यावर असेल.

अधिनियमा-खाली केलेल्या कारवाईला संरक्षण. १५. (१) कलम ३ खाली काढलेल्या कोणत्याही आदेशाला अनुसरुन सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तिविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(२) कलम ३ खाली काढलेल्या आदेशाला अनुसरुन सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होणे संभवनीय असलेल्या कोणत्याही नुकसानाबद्दल शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

लोक सेवकांविरुद्ध खटला भरणे. [2][१५क. एखादी व्यक्ती लोक सेवक असून, कलम ३ खाली काढलेल्या आदेशाच्या अनुरोधाने आपले कर्तव्यपालन करण्यासाठी कार्य करीत असताना किंवा तसे म्हणून कार्य करीत असताना तिने एखादा अपराध केला असल्याचे अधिकथन करून तिच्यावर आरोप करण्यात आला असेल तेव्हा,—

(क) अशी जी व्यक्ती संघराज्याच्या कारभारासंबंधात नोकरीला असेल, किंवा प्रकरण-परत्वे, अभिकथित अपराध घडला त्यावेळी तेथे नोकरीला होती तिच्या बाबतीत, शासनाच्या

(ख) अशी जी व्यक्ती राज्याच्या कारभारासंबंधात नोकरीला असेल, किंवा, प्रकरणपरत्वे, अभिकथित अपराध घडला त्यावेळी तेथे नोकरीला होती तिच्या बाबतीत, राज्य शासनाच्या,

पूर्वमंजुरीखेरीज कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही.]

---

१. १९७४ चा अधिनियम ३० कलम ११ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२२ जून, १९७४ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ९२, कलम ८ द्वारे घातले.

निरसन व व्यावृत्ती. १६. (१) खालील कायदे याद्वारे निरसित करण्यात आले आहेत :—

(क) 'अत्यावश्यक वस्तू अध्यादेश, १९५५'; १९५५ चा १.

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही राज्यात अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा जेथवर एखाद्या अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण आणि तद्विषयक व्यापार व वाणिज्य यांचे नियंत्रण करतो अथवा त्यांच्या नियंत्रणास प्राधिकृती देतो तेथवर असा कायदा.

(२) असे निरसन झाले असले तरीही, याद्वारे निरसित करण्यात आलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली कोणत्याही प्राधिकरणाने काढलेला किंवा काढला असल्याचे मानण्यात येणारा कोणताही आदेश, या अधिनियमाखाली तसा आदेश काढता येईल तेथवर, या अधिनियमाखाली काढण्यात आला असल्याचे मानले जाईल आणि त्याचा अंमल चालू राहील आणि तदनुसार, अशा कोणत्याही आदेशाखाली करण्यात आलेली नियुक्ती, मंजूर करण्यात आलेले लायसन किंवा परवाना अथवा देण्यात आलेला निदेश या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असेल तर, या अधिनियमाखाली करण्यात आलेली नियुक्ती, मंजूर करण्यात आलेले लायसन किंवा परवाना किंवा काढण्यात आलेला निदेश यांच्यामुळे ते निष्प्रभावी झाले नाही तर व तोपर्यंत अंमलात राहतील.

१८९७ चा १०. (३) पोटकलम (२) च्या उपबंधामुळे 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' याच्या कलम ६ मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांना बाध येणार नाही व ते पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला अध्यादेश किंवा इतर कायदा म्हणजे जणू काही एखादी अधिनियमिती असावी त्याप्रमाणे अध्यादेशाच्या किंवा इतर कायद्याच्या निरसनासही लागू होतील.

# १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

## अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी 'अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५' हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, त्यात सुधारणा करण्यासाठी राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती, आणि म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी 'अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, १९७५' हा दिनांक १२ नोव्हेंबर, १९७५ रोजी प्रख्यापित केला ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या विधेयकात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** आता भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास 'अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७५' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो १२ नोव्हेंबर, १९७५ पासून अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

२. 'अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५' (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निदश करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, त्याच्या कलम २ मध्ये,— **१९५५ चा अधिनियम क्र. १० याच्या कलम २ ची सुधारणा.**

(क) "संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर" या मजकुरानंतर व खंड (क्) च्या पूर्वी पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(एक क्-१) बृहन्मुंबईच्या बाबतीत "जिल्हाधिकारी" याचा अर्थ, शिधावाटप नियंत्रक असा आहे आणि त्यात, कोणत्याही उप किंवा सहायक शिधावाटप नियंत्रकाचा समावेश होतो आणि अन्यत्र त्याचा अर्थ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी असा होतो व आपापल्या अधिकारितेत कोणत्याही सहायक किंवा उप जिल्हाधिकाऱ्याचा किंवा जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याचा त्यात समावेश होतो ;";

(ख) खंड (ख्) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

"(ख्क्) कोणत्याही शेतजमिनीच्या संबंधात, "धारक" याचा अर्थ अशा जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा असलेली व्यक्ती असा आहे आणि त्यात एखादी कंपनी किंवा इतर निगम निकाय, भागीदारी संस्था, संघ, अशा जमिनीचा संयुक्त कब्जा असलेले एकत्र कुटुंब किंवा व्यक्तिसमूह यांचा समावेश होतो ;

(ख्) "धारणजमीन" याचा अर्थ, एखाद्या धारकाच्या कब्जात असलेल्या एकूण सर्व जमिनी असा आहे;".

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,— **१९५५ चा अधिनियम क्र. १० याच्या कलम ३ ची सुधारणा.**

(क) पोटकलम (२) च्या खंड (च्) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल आणि तसा तो नेहमीसाठीच दाखल करण्यात आल्याचे मानण्यात यईल :—

"(च्) जिच्याकडे कोणत्याही अत्यावश्यक वस्तुचा साठा असेल किंवा साठा असण्याची शक्यता असेल किंवा जी अत्यावश्यक वस्तुच्या निर्मितीत, किंवा उत्पादनात किंवा संस्करणात गुंतलेली असेल किंवा अत्यावश्यक वस्तू खरेदी करण्याचा किंवा विकण्याचा जिचा व्यवसाय असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, तिने साठा केलेल्या किंवा साठा करण्याची शक्यता असलेल्या किंवा तिने निर्मिलेल्या किंवा उत्पादित केलेल्या किंवा संस्कारित केलेल्या किंवा निर्माण करण्याची किंवा उत्पादन करण्याची किंवा संस्कारित करण्याची शक्यता असलेल्या किंवा तिच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या व्यवसायात तिला मिळालेल्या किंवा मिळण्याची शक्यता असलेल्या अत्यावश्यक वस्तुच्या परिमाणातील संपूर्ण किंवा विनिर्दिष्ट भाग केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला किंवा कोणत्याही शासनाच्या अधिकाऱ्याला किंवा अभिकर्त्याला किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला आणि अशा परिस्थितीत विकण्यास भाग पाडणे.

**स्पष्टीकरण.**—अन्नधान्याच्या संबंधात या खंडान्वये काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे, उत्पादकाने विकावयाचे परिमाण, त्याने धारण केलेल्या जमिनीच्या स्वरूपाच्या व मर्यादेच्या संदर्भा किंवा- ज्यांना पाटबंधाऱ्यांच्या किंवा इतर सुविधा मिळतात अशा विवक्षित पिकांसाठी तजमिनी किंवा

साठी विहित करण्यात येतील अशा विवक्षित भारांकासह त्याच्याकडून देय असलेल्या जमीन-महसुलाच्या संदर्भात निश्चित करता येईल किंवा त्याच्या निश्चितीकरणाची तरतूद करता येईल. तसेच, वेगवेगळ्या उत्पादकांच्या धारणजमिनींचा आकार लक्षात घेऊन श्रेणीबद्ध तत्वावर विकावयाचे परिमाणदेखील निश्चित करता येईल किंवा त्याच्या निश्चितीकरणाची तरतूद करता येईल." ;

(ख) पोटकलम (३) मध्ये खंड (ग्) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल व तो नहमीसाठीच दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :—

"(ग्) खंड (क्) किंवा खंड (ख्) यापैकी कोणताही खंड जेव्हा लागू होत नसेल तेव्हां अन्नधान्याच्या बाबतीत, पोटकलम (३ख) सहित पोटकलम (२) च्या खंड (च्) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार विनिर्दिष्ट करण्यात आलेली किंवा परिगणित करण्यात आलेली कोणतीही रक्कम असल्यास ती, आणि इतर कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंच्या बाबतीत विक्रीच्या दिवशी त्या वस्तीत चालू असलेल्या बाजारभावाने परिगणित करण्यात आलेली किंमत.";

(ग) पोटकलम (३ख) ऐवजी पुढील पोटकलम दाखल करण्यात येईल व ते नेहमीसाठी दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :—

"(३ख) पोटकलम (२) च्या खंड (च्) च्या संदर्भात काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे एखाद्या व्यक्तीस, अन्नधान्याची कोणतीही प्रत किंवा प्रकार, खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले केंद्र सरकारला किंवा राज्य शासनाला किंवा अशा शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याला किंवा अभिकर्त्याला किंवा अशा शासनाच्या मालकीच्या किंवा त्याने नियंत्रित केलेल्या एखाद्या महामंडळाला किंवा त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला विकण्यास फर्माविण्यात आले असेल आणि अशा अन्नधान्यांच्या, खाद्य तेल-बियांच्या किंवा खाद्य तेलांच्या संबंधात एकतर पोटकलम (३क) अन्वये कोणतीही अधि-सूचना काढण्यात आली नसेल किंवा अशी अधिसूचना काढली असून त्यानंतर बराच काळ लोटल्याने ती अंमलात असण्याचे बंद झाले असेल त्याबाबतीत, पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संबंधित व्यक्तीला केंद्र सरकारने किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासनाने पुढील गोष्टी विचारात घेऊन निर्धारित केलेली रक्कम देण्यात येईल :—

(क्) अशा दर्जाचे किंवा प्रकारचे अन्नधान्य किंवा खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले यांच्यासाठी या कलमाद्वारे किंवा तदन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये कोणतीही नियंत्रित किंमत निश्चित करण्यात आली असल्यास ती, किंवा

(ख्) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये अशा अत्यावश्यक वस्तूच्या बाबतीत कोणतीही नियंत्रित किंमत निश्चित करण्यात आलेली नसेल त्याबाबतीत कृषि किंमत आयोगाद्वारे संबंधित अत्यावश्यक वस्तूच्या संबंधाने शिफारस करण्यात आलेल्या किंमती".

**१९५५ चा अधिनियम क्र. १० याच्या कलम ६ क ऐवजी नवीन कलम दाखल करणे.**

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ क ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

**"अभिग्रहण" केलेल्या अत्यावश्यक वस्तू सरकारजमा करणे.**

६क. (१) कोणतीही अत्यावश्यक वस्तू तिच्या संबंधात कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार अभिग्रहण करण्यात आली असल्यास, ज्याच्या अधिकारितेत ती अभिग्रहण करण्यात आली असेल त्या जिल्हाधिकाऱ्याकडे तशा अर्थाचा अहवाल गैरवाजवी विलंब न करता पाठविण्यात येईल आणि तो जिल्हाधिकारी, त्यास तसे करणे इष्ट वाटल्यास, अशा अत्यावश्यक वस्तूचे निरीक्षण करील किंवा करवून घेईल आणि —अशा आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल खटला भरण्यात आलेला असो वा नसो—आदेशाचे उल्लंघन झाले असल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांची खात्री झाल्यास, तो—

(क्) अशा प्रकारे अभिग्रहण केलेली अत्यावश्यक वस्तू,

(ख्) ज्यात अशी अत्यावश्यक वस्तू आढळली असेल असे कोणतेही आवेष्टन, आच्छादन किंवा पात्र, आणि

(ग्) अशी अत्यावश्यक वस्तू वाहून नेण्यासाठी ज्याचा वापर करण्यात आला असेल असे कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा इतर वाहन,

सरकारजमा करण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधान्वये करण्यात येईल अशा कोणत्याही कारवाईस बाध न येता, कोणतेही अन्नधान्य किंवा खाद्य तेलबिया यांच्या संबंधात कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार त्या उत्पादकाकडून अभिग्रहण केले असल्यास, अभिग्रहण केलेले अन्नधान्य किंवा खाद्य तेलबिया यांचे त्यानेच उत्पादन केलेले असल्यास ते या कलमान्वये सरकारजमा करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, माल किंवा उतारू भाड्याने वाहून नेण्यासाठी कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा इतर वाहन वापरले जात असल्यास, असे जनावर, वाहन, जलयान किंवा इतर वाहन याच्या मालकास ते सरकारजमा करण्याऐवजी त्यास, वाहून नेण्याचा प्रयत्न करण्यात आलेली अत्यावश्यक वस्तू अभिग्रहण केल्याच्या तारखेस तिचे जे बाजारमूल्य असेल त्याहून अधिक होणार नाही इतका दंड भरण्याचा विकल्प देण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अभिग्रहण केल्याबद्दलचे वृत्त मिळाल्यावर किंवा कोणत्याही अत्यावश्यक वस्तूचे निरीक्षण केल्यावर जिल्हाधिकाऱ्याचे जर असे मत झाले की, अशी अत्यावश्यक वस्तू ही जलद व नर्सगिकरीत्या नाशिवंत आहे, किंवा अन्यथा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे उचित आहे, तर तो अशी वस्तू त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये निश्चित करण्यात आलेली कोणतीही नियंत्रित किंमत असल्यास, त्या किंमतीला किंवा अशी कोणतीही किंमत निश्चित केलेली नसल्यास लिलावाद्वारे विकावयाचा आदेश देऊ शकेल :

परंतु, अन्नधान्याच्या बाबतीत, कोणतीही नियंत्रित किंमत निश्चित केलेली नसल्यास, जिल्हाधिकारी अभिग्रहण केलेल्या अन्नधान्याची रास्त भावाच्या दुकानातून जनतेला विकण्यात यावयाच्या अशा अन्नधान्यासाठी, केंद्र सरकारकडून किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासनाकडून जी किंमत निश्चित करण्यात आली असेल त्या किंमतीला अशा दुकानातून विक्री करण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, अत्यावश्यक वस्तूचे स्वरूप लक्षात घेऊन, तसे करणे व्यवहार्य असेल तेथवर तो वस्तूचा नमुना, ती विकली जाण्यापूर्वी किंवा तिचा लिलाव होण्यापूर्वी घेऊन ठेवील व त्याचे जतन करील.

(३) पूर्वोक्ताप्रमाणे जेव्हा कोणतीही अत्यावश्यक वस्तू विकण्यात आली असेल त्या बाबतीत विक्रीचा किंवा, प्रकरणपरत्वे, लिलावाचा खर्च वजा केल्यानंतर तिच्या विक्रीचे उत्पन्न हे—

(क) जिल्हाधिकाऱ्यांकडून 'अंतिमत: सरकारजमा करण्याचा आदेश दिला गेला नसेल तर, किंवा

(ख) कलम ६ग, पोट-कलम (१) अन्वये केलेल्या अपिलान्ती दिलेल्या आदेशाद्वारे तसे करणे आवश्यक असेल तर, किंवा

(ग) ज्याच्या बाबतीत या कलमान्वये सरकारजमा करण्याचा आदेश दिला गेला असेल अशा आदेशाच्या उल्लंघनाबद्दल दाखल केलेल्या खटल्याच्या प्रकरणात संबंधित व्यक्ती दोषमुक्त झाली असेल तर,

तिच्या मालकास किंवा जिच्याकडून ती अभिग्रहण करण्यात आली असेल त्या व्यक्तीस देण्यात येईल :

परंतु, पोट-कलम (२) च्या पहिल्या परंतुकानुसार अन्नधान्य रास्त भावाच्या दुकानातून विकले असेल त्या बाबतीत, मालकाला, अशा विक्री केलेल्या अन्नधान्याबद्दल, अशा दुकानातून अशा अन्नधान्याच्या फुटकळ विक्रीसाठी राज्य शासनाने निश्चित केलेल्या मूल्यामधून पोट-कलम (२) अन्वये विक्रीचा किंवा लिलावाचा खर्च वजा करून आलेले मूल्य देण्यात येईल."

**१९५५ चा अधिनियम क्र. १० याच्या कलम ६ ग ची सुधारणा.**

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ ग, पोट-कलम (२) मध्ये "अशा व्यक्तीला तिची किंमत" या शब्दाऐवजी "अशा व्यक्तीला कलम ६ क, पोट-कलम (३) मध्ये उपबंधित केलेली बाब खेरीजकरून एरव्ही, तिची किंमत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**विधिग्राह्यता.**

६. कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, मुख्य अधिनियमाच्या कलम ३ अन्वये त्या कलमाच्या पोट-कलम (२) च्या खंड (च) च्या संदर्भात, अन्नधान्याच्या बाबतीत दिलेला कोणताही आदेश हा, जणू काही या अधिनियमाचा खंड ३ हा नेहमीच अंमलात होता असे समजून या अधिनियमाच्या खंड ३ अन्वये सुधारणा केल्याप्रमाणे असलेल्या उक्त कलम ३ अन्वये देण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार असा कोणताही आदेश हा विधिग्राह्य असेल आणि तो नेहमीकरताच विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल.

**१९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ याचे निरसन व व्यावृत्ती.**

७. (१) 'अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, १९७५' हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अध्यादेश निरसित केला असला तरीदेखील, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही या अधिनियमाद्वारे सुधारलेल्या उक्त अधिनियमान्वये केलेली कृती किंवा, प्रकरणपरत्वे, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

## अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५

## THE ESSENTIAL COMMODITIES ACT, 1955

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अत्यावश्यक वस्तू | essential commodity | [क. २ (क्)] |
| अधिसूचित आदेश | notified order | [क. २ (ग्)] |
| अन्नपिके | food-crops | [क. २ (ख्)] |
| अन्नसामग्री | foodstuffs | [क. २ (क्) (पाच)] |
| आच्छादन | covering | [क. ३ (२) (ज्) (एक)] |
| आवेष्टन | package | [क. ३ (२) (ज्) (एक)] |
| उपसाधने | accessories | [क. २ (क्) (तीन)] |
| कच्चा कापूस | raw cotton | [क. २ (क्) (नऊ)] |
| कच्चा ताग | raw jute | [क. २ (क्) (दहा)] |
| कर्तव्ये नेमून देणे | imposition of duties | [क. ४स.टी.] |
| कागदी पुठ्ठा | paper board | [क. २ (क्) (सात)] |
| खडीसाखर | sugar-candy | [क. २ (ङ) (एक)] |
| खांडसारी साखर | khandsari sugar | [क. २ (ङ) (दोन)] |
| खाद्य तेलबिया | edible oilseeds | [क. २ (क्) (पाच)] |
| गुरांची वैरणं | cattle fodder | [क. २ (क्) (एक)] |
| गृहीतक | presumption | [क. १३-स.टी.] |
| गृहीत धरणे | presume | [क. १३] |
| घटक भाग | component parts | [क. २ (क्) (तीन)] |
| तज्जन्य पदार्थ | derivatives | [क. २ (क्) (दोन)] |
| दाणेदार स्वरुपातील साखर | sugar in crystalline form | [क. २ (ङ) (दोन)] |
| नियंत्रणविषयक कार्याधिकारी | functions of control | [क. ३ (४)] |
| न्यायोचित वितरण | equitable distribution | [क. ३ (१)] |
| निर्वात पात्र | vacuum pan | [क. २ (ङ) (तीन)] |
| पात्र | receptacle | [क. ३-२ (ज्) (एक)] |
| पिठीसाखर | crushed sugar | [क. २ (ङ) (दोन)] |
| पेंड | oilcake | [क. २ (क्) (एक)] |
| पेंढ्यापासून बनवलेला पुठ्ठा | straw-board | [क. २ (क्) (सात)] |
| प्रक्रियाधीन | in process | [क. २ (ङ) (तीन)] |
| बुरा साखर | bura sugar | [क. २ (ङ) (दोन)] |
| भुकटीच्या स्वरुपातील साखर | sugar in powdered form | [क. २ (ङ) (दोन)] |
| मूकानुमती | connivance | [क. १० (२)] |
| मोटार | automobile | [क. २ (क्) (तीन)] |
| लोकरी कापड | woollen textile | [क. २ (क्) (चार)] |
| लोकहित | public interest | [क. ३ (२) (छ्)] |
| लोखंडाची उत्पादने | products of iron | [क. २ (क्) (सहा)] |
| वस्तू | commodity | [पूर्ण नाव] |

| | | |
|---|---|---|
| विक्री रोखून धरणे | withholding from sale | [क. ३(२) (ङ)] |
| वृत्तपत्री कागद | newsprint | [क. २(क्) (सात)] |
| व्यक्तिसंघ | association of individuals | [क. १०(२)स्पष्टी. (क्)] |
| व्यवस्थापनविषयक कार्याधिकार | functions of management | [क. ३(४) (ख्)] |
| सत्वे | concentrates | [क. २(क्) (एक)] |
| संमत किंमत | agreed price | [क. ३(३क) तीन (क्)] |
| सरकी | cotton seed | [क. २ (क्) (नऊ)] |
| सरकी काढलेला | ginned | [क. २(क्) (नऊ)] |
| सरकी न काढलेला | unginned | [क. २(क्) (नऊ)] |
| साखर निर्मिती | manufacturing sugar | [क. ३(३ग) (स्पष्टी)] |
| साठा बाळगणे | holding in stock | [क. ३(२) (च्) (क्)] |
| सुक्रोज | sucrose | [क. २(ङ) (एक)] |
| स्थानिक भाग | locality | [क. ३(३क) (तीन) (ग्)] |
| हानिकारक | detrimental | [क. ३(२) (छ्)] |

एच-४१७९—५ (१०२६—३-९८)

# THE ESSENTIAL COMMODITIES ACT, 1955

## अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| accessories | उपसाधने | [S. 2(a)(iii)] |
| agreed price | संमत किंमत | [S. 3(3A)(iii)(a)] |
| association of individuals | व्यक्तिसंघ | [S. 10(2)-expl.(a)] |
| automobile | मोटार | [S. 2(a)(iii)] |
| bura sugar | बुरा साखर | [S. 2(e)(ii)] |
| cattle fodder | गुरांची वैरण | [S. 2(a)(i)] |
| commodity | वस्तू | [long title] |
| component parts | घटक भाग | [S. 2(a)(iii)] |
| concentrates | सत्त्वे | [S. 2(a)(i)] |
| connivance | मूकानुमती | [S. 10(2)] |
| cotton seed | सरकी | [S. 2(a)(ix)] |
| cotton textile | सुती कापड | [S. 2(a)(ix)] |
| covering | आच्छादन | [S. 3(2)(j)(i)] |
| crushed sugar | पिठी साखर | [S. 2(e)(ii)] |
| derivatives | तज्जन्य पदार्थ | [S. 2(a)(ii)] |
| detrimental | हानिकारक | [S. 3(2)(g)] |
| edible oilseeds | खाद्य तेलबिया | [S. 2(a)(v)] |
| equitable distribution | न्यायोचित वितरण | [S. 3(1)] |
| essential commodity | अत्यावश्यक वस्तू | [S. 2(a)] |
| food-crops | अन्नपिके | [S. 2(b)] |
| foodstuffs | अन्नसामग्री | [S. 2(a)(v)] |
| functions of control | नियंत्रणविषयक कार्याधिकार | [S. 3(4)] |
| functions of management | व्यवस्थापनविषयक कार्याधिकार | [S. 3(4)(b)] |
| ginned | सरकी काढलेला | [S. 2(a)(ix)] |
| holding in stock | साठा बाळगणे | [S. 3(2)(f)] |
| imposition of duties | कर्तव्ये नेमून देणे | [S. 4(m.n.)] |
| in process | प्रक्रियाधीन | [S. 2(e)(iii)] |
| khandsari sugar | खांडसरी साखर | [S. 2(e)(ii)] |
| locality | स्थानिक भाग | [S. 3(3A)(iii)(c)] |
| manufacturing sugar | साखर निर्मिती | [S. 3(3C)(expl.)] |
| newsprint | वृत्तपत्री कागद | [S. 2(a)(vii)] |
| notified order | अधिसूचित आदेश | [S. 2(c)] |
| oilcake | पेंड | [S. 2(a)(i)] |
| package | आवेष्टन | [S. 3(2)(j)(i)] |
| paperboard | कागदी पुठ्ठा | [S. 2(a)(vii)] |
| presume | गृहीत धरणे. | [S. 13] |

| | | |
|---|---|---|
| presumption | गृहीतक | [S. 13(m.n.)] |
| products of iron | लोखंडाची उत्पादने | [S. 2(a)(vi)] |
| public interest | लोकहित | [S. 3(2)(g)] |
| raw cotton | कच्चा कापूस | [S. 2(a)(ix)] |
| raw jute | कच्चा ताग | [S. 2(a)(x)] |
| receptacle | पात्र | [S. 3(2)(j)(i)] |
| straw-board | पेंढ्यापासून बनवलेला पुठ्ठा | [S. 2(a)(vii)] |
| sucrose | सुक्रोज | [S. 2(e)(i)] |
| sugar-candy | खडीसाखर | [S. 2(e)(i)] |
| sugar in crystalline form | दाणेदार स्वरुपातील साखर | [S. 2(e)(ii)] |
| sugar in powdered form | भुकटीच्या स्वरुपातील साखर | [S. 2(e)(ii)] |
| unginned | सरकी न काढलेला | [S. 2(a)(ix)] |
| vacuum pan | निर्वात पात्र | [S. 2(e)(iii)] |
| withholding from sale | विक्री रोखून धरणे | [S. 3(2)(e)] |
| woollen textile | लोकरी कापड | [S. 2(a)(iv)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : ३६३ २६ ९३, ३६३ ०६ ९५
  ३६३ ११ ४८, ३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : ६६ ८८ ५९

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : ५२ २६ १५

- **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१
  दूरध्वनी : ३३ १४ ६८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : ६५ ०३ ९५ व ६५ ०४ ०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते